# माध्यमविद्या

## राष्ट्रीय विज्ञान सप्ताह विशेषांक

'A'"' Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

"Integrated Approach In Science And Technology For A Sustainable Future."

Azadi Ka Amrit Mohotsav

कोल्हापूर | सोमवार : दि. २८ फेब्रुवारी, २०२२ | ▪ पाने ४ | ▪ खासगी वितरणासाठी


**डॉ. सी. व्ही. रमण यांना राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने अभिवादन!**



डॉ. चंद्रशेखर व्यंकट रमण यांना 'रमण इफेक्ट्स' या शोधासाठी भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले नोबेल पुरस्कार प्राप्त करणारे ते पहिले आणि एकमेव भारतीय आहेत. नॅशनल कौन्सिल फॉर सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी कम्युनिकेशन यांचे सुचनेनुसार भारत सरकारने १९८७ पासून '२८ फेब्रुवारी' हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून घोषित केला आहे.

## विज्ञान जागृती सप्ताह विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी– डॉ. श्याम कोहली

**कोल्हापूर : (रोहित कांबळे, पवन पाटील)**

विद्यार्थ्यांना विज्ञानातील संधींची माहिती मिळावी आणि विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी केंद्र सरकारने 'स्तुती' हा उपक्रम हाती घेतला आहे, या उपक्रमाचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे प्रतिपादन केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तरुण भारत वृत्तपत्र समूहाचे अध्यक्ष व लोकमान्य को-ऑपरेटिव्ह मल्टिपर्पज सोसायटीचे चेअरमन किरण ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती.

'आजादी का अमृत महोत्सव'चे औचित्य साधून विद्यापीठातील एसएआयएफ- डीएसटी केंद्राच्या वतीने 'डीएसटी-स्तुती' कार्यक्रमा-अंतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ. कोहली म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम देशातील सर्व राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्च २०२१ पासून पुढील ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, वैज्ञानिक संशोधन विकासाबद्दल गोडी निर्माण व्हावी, यासाठी देशभरातील १३ केंद्रांची निवड करून तेथे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठ या एकमेव अकृषी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. 'डीएसटी-फिस्ट'अंतर्गत शिवाजी विद्यापीठात सहा प्रकल्प सुरू आहेत. त्याचप्रमाणे 'डीएसटी-पर्स', 'डीएसटी- एसएआयएफ', 'डीएसटी-साथी', यांसह 'रामानुजन फेलोशिप' आदी बारापेक्षा अधिक उपक्रम व प्रकल्प येथे सुरू आहेत, ही अत्यंत समाधानाची बाब आहे.



दीपप्रज्वलन प्रसंगी डावीकडून दै. तरूण भारत समुहाचे अध्यक्ष किरण ठाकूर, डॉ श्याम कोहली, प्रा. (डॉ.) आर. व्ही. कामत, कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, समन्वयक, प्रा. (डॉ.) आर. जी सोनकवडे, प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पी एस पाटील

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थ्यांच्या डोळ्यासमोर उद्याच्या विज्ञानाची स्वप्ने यावीत, त्याबरोबरच दररोजच्या कॉलेज जीवना व्यतिरिक्त विद्यापीठातील विविध विज्ञान विभागांना भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरसाठी योग्य दिशा ठरवता येईल.

या प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात शिवाजी विद्यापीठाच्या विविध विज्ञान अधिविभागांत उपलब्ध असलेल्या वैज्ञानिक उपकरणे, सुविधांची माहिती दिली.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी याप्रसंगी मान्यवरांचे स्वागत केले, तर आभार डीएसटी-एसएआयएफ केंद्र आणि विज्ञान जागृती सप्ताहाचे समन्वयक प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मानले. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले. यावेळी शिवाजी विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**राष्ट्रीय विज्ञान सप्ताहाच्या निमित्ताने मान्यवरांची मनोगते**

### भविष्यातील शास्त्रज्ञ घडावेत : कुलगुरू प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के



विद्यार्थ्यांची विज्ञानाबद्दल जागृती, त्यामध्ये रुची निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून विद्यापीठात प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांना नेहमी प्रश्न पडायला हवेत, ते प्रश्न निःसंकोचपणे विचारायला हवेत, सर्व विभागांना भेट दिल्यानंतर दिवसभरात मिळवलेल्या ज्ञानाचे चिंतन करावे, तरच त्यांना सर्वांगीण विकास साधता येईल. भविष्यामध्ये जास्तीत जास्त चांगले वैज्ञानिक देशामध्ये तयार व्हावेत, उद्याचा भारत घडविण्याचे काम अशा उपक्रमांमधून होईल. हा उपक्रम राबवण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, संशोधक-विद्यार्थी, कर्मचारी, विद्यार्थी आणि प्रशासकीय सेवक यांचे मोलाचे योगदान आहे. विज्ञान जागृती सप्ताह निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.

### विद्यार्थ्यांच्या कार्यकुशलतेला वाव : प्र-कुलगुरू प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील.



देशभरातील नामांकित शास्त्रज्ञ, संशोधक, यांच्या व्याख्यानाने विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दिवसाची सुरुवात होणार आहे. विद्यापीठाच्या सीएफसी केंद्रांमध्ये अत्याधुनिक उपकरणांची माहिती या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यात येथील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या मनातील कार्यकुशलता, बौद्धिकता यांना वाव मिळण्यासाठी हा विज्ञान सप्ताह व्यासपीठ ठरत आहे. विद्यापीठातील अत्याधुनिक यंत्रसामग्री पाहून शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनामध्ये कुतूहल निर्माण होण्यास मदत होईल. यातूनच वैज्ञानिक संकल्पना वाढीस लागण्यास चालना मिळेल. विज्ञान सप्ताह हा एक आठवड्यापुरता नसून शिवाजी विद्यापीठ असे अनेक उपक्रम एक वर्ष राबवणार आहे. प्रत्येक विभागातील वैशिष्ट्यांचा उपयोग सर्वांना व्हावा, असा विद्यापीठाचा मानस आहे.

### वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज : प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे



डॉ. सी व्ही रमण यांच्यानंतर दुसरा नोबेल पुरस्कार भारतीय विज्ञान जगताला मिळालेला नाही. एखाद्या भारतीय नागरिकाला विज्ञानातील नोबेल पुरस्कार मिळण्याची घटना ही एकमेव आहे. त्यामुळे विद्यार्थीदशेपासून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाचा दृष्टिकोन निर्माण होणे गरजेचे आहे. 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा करण्याच्या या उद्देशाला सध्या व्यापक स्वरूप येत आहे. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना विद्यापीठ पातळीवर अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देत, त्यांना मार्गदर्शनासाठी शिवाजी विद्यापीठाने व्यासपीठ निर्माण केले आहे. विज्ञान सर्वदूर पोहोचवण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे ठरणार आहेत.

### विज्ञानाचे सार्वत्रिकीकरण व्हावे: प्रा. (डॉ.) आर. जी. सोनकवडे एसएआयएफ-डीएसटी समन्वयक



या सप्ताहादरम्यान दुर्गम भागातील विद्यार्थी शिवाजी विद्यापीठाला भेट देत आहेत. येथून विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विज्ञान क्षेत्रात काम करण्यास प्रेरणा मिळेल. हा दृष्टिकोन जेव्हा तळागाळात पोहोचेल तेव्हा या देशात अनेक शास्त्रज्ञ तयार होतील. या विद्यार्थ्यांपैकी दोन टक्के जरी संशोधक झाले, तरी ते या उपक्रमाचे यश असेल. विज्ञान हा देशाच्या विकासाचा पाया असल्याने विज्ञान विषयक मूल्यांची जोपासना विद्यार्थ्यांनी करावी. शाश्वत विकासासाठी विज्ञानाचा योग्य वापर करावा.

(संकलन: आरती कांबळे, सिमरन ठाणेकर)

## शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिका: प्रा. डॉ. बी. के. जगताप

### शिवाजी विद्यापीठातील विज्ञान जागृती सप्ताहाचा समारोप

**कोल्हापूर (महेश कांबळे, प्रथमेश पाटील):**



स्वराज्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगडावर तोफेचे कारखाने उभे केले, नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवरायांकडुन विज्ञाननिष्ठा शिका, असे प्रतिपादन आयआयटी मुंबईचे जेष्ठ प्राध्यापक, डॉ. बी. एन. जगताप यांनी शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात केले. विद्यापीठाच्या एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने आयोजित विज्ञान साप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे आणि विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे आधिष्ठाता प्रा.डॉ.आर.के.कामत यांची प्रमुख उपस्थिती होती.

आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून केंद्र सरकारच्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा प्रशिक्षण (STUTI) कार्यक्रमा अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी प्राध्यापक जगताप पुढे म्हणाले, युरोपात वाफेच्या इंजिनाच्या शोधाने औद्योगिक क्रांती झाली. हे तंत्रज्ञान क्षेत्रातील मोठे परिवर्तन होते, पुरातन भारतही विज्ञाननिष्ठ होता, पण वाफेच्या इंजिनचा वापर भारतातील हात कामगारांनी केला असता तर सध्याचे चित्र वेगळे असते. विज्ञान फक्त शहरांपुरते मर्यादित राहीले तर कोणतेही शाश्वत बदल होणार नाहीत. मात्र असे उपक्रम राबवून दुर्गम भागात विज्ञान पोहोचण्यासाठी, या उपक्रमांचे महत्व पुन्हा अधोरेखित होते.



विद्यार्थ्यांना भेटवस्तूंचे वाटप करताना, डावीकडून प्रा. डॉ. बी. के. जगताप, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे आणि प्रा. डॉ. आर. के. कामत. (छायाचित्र: चेतन सूर्यवंशी, विवेक राजवर्धन)

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी विद्यापीठाचे प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. तर अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले